International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# महिलांचे अधिकार आणि हक्क विषयी: समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. गजानन खंडू सोनुने**
*संशोधन विद्यार्थी (पी डी एफ),*
*समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)*
*Corresponding Author - डॉ. गजानन खंडू सोनुने*
**DOI - 10.5281/zenodo.10963613**

महिला आणि पुरुषांमधील समानता प्राप्त करणे आणि महिलांवरील सर्व प्रकारचे भेदभाव दूर करणे हे मूलभूत मानवी हक्क आणि संयुक्त राष्ट्रांची मूल्ये आहेत. जगभरातील महिलांना, तथापि, त्यांच्या आयुष्यभर त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन सामान्यतः अनुभवले जाते, आणि महिलांच्या मानवी हक्कांना नेहमीच प्राधान्य दिले जात नाही, स्त्री आणि पुरुषयांच्यातील समानता प्राप्त करण्यासाठी महिलांना कोणत्या मार्गांनी भेदभावाचा सामना करावा लागतो आणि कोणत्या मार्गांनी भेदभाव केला जातो. हे सर्व समावेशक समजून घेणे आवश्यक आहे. असा भेदभाव दूर करण्यासाठी योग्य धोरणे आणि मानदंड विकसित, नियमाने तयार करण्याची आवश्यकता वाटते कारण भारतात लिंग आधारित स्त्री आणि पुरुष याआधारावर आणि वय, वंश, राष्ट्रीयत्व, धर्म, आरोग्य स्थिती, वैवाहिक स्थिती, शिक्षण, अपंगत्व आणि सामाजिक-आर्थिक स्थितीयांच्या आधारावर अतिरिक्त प्रकारचा भेदभाव केला जात असल्याचे जाणवते. महिलांना अनेक समस्याना तसेच भेदभावाचा सामना करावा लागतो. महिलांच्याबाबत होत असलेल्या भेदभाव दुर करण्यासाठी महिलांना विशिष्ट अधिकार आणि हक्क देण्यात आले. परंतु महिलांना त्यांचे अधिकार आणि हक्क पूर्णपणे आजही मिळविताना अनेक अडचणी आणि समस्या समोर येतात. एकंदरीत महिलांचे जीवन आणि जीवन जगत असताना येणाऱ्या अडचणी, भेदभाव, असमानता, दुय्यम वागणूक, अहवेलना, अधिकार, हक्क यांचा विचार केल्यास भेदभावाचे मुख्य कारणांचा आणि त्या समस्याचे कारण मिमांसा करून, त्यावर उपाययोजना करणे आवश्यक असते. अशा अन्याय कारक कारणासंबधी कोटोर नियम, कायदे, करणे आवश्यक आहे. याशिवाय महिलांच्या हक्कांना प्राधान्य देऊन त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीला चालना दिली पाहिजे.

समाजात महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांना प्राथमिक स्त्रोत मानले जाते. जे कुटुंब वाढवतात आणि त्यांचे पालनपोषण करतात. देशाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान त्यांच्या पुरुष समकक्षांच्या बरोबरीचे असूनही, तरीही त्यांना

अनेक मर्यादांचा अनुभव येतो. ज्यामुळे त्यांना त्यांच्या वाढीची क्षमता ओळखण्यास प्रतिबंध होतो. यादृष्टीकोनाच्या विरोधात भारत सरकार महिलांच्या गरजा आणि हितसंबंधांना प्राधान्य देण्याची आणि त्यांच्या सक्षमीकरणा दरम्यान येणाऱ्या अडथळ्यांवर मात करून विविध कार्यक्षेत्रात त्यांचे योगदान ओळखण्याची गरज वाटली. महिला सबलीकरण या शब्दाचा अर्थ तिच्याशी संबंधित असलेले सर्व महत्त्वाचे निर्णय स्वतंत्र आधारावर घेण्याची महिलांची क्षमता आहे, जी तिच्या संपूर्ण जीवनात तिला जीवनाच्या प्रत्येक पावल्या पावली यश मिळवून देईल.

महिला समाजात वावरत असताना त्याला सामाजिक बंधनाची पालन करावे लागते. मात्र हे नियम सर्वांना सारखेच असणे अपेक्षित आहे. सर्व व्यक्तीं निसर्गापुढे समान आहेत. निसर्गाचा एक घटक म्हणून जीवन जगताना तिला नैसर्गिककडून आपोआपच प्राप्त होतात. त्यामध्ये जीवण जगण्याचा, स्वतंत्र्याचा, उपभोग घेण्याचा अधिकार येतो.भारत हा लोकशाही देश आहे.भारतामध्ये अनेक जाती-जमातींचे, धर्मांचे, वंशांचे लोक राहतात.भारताने प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य दिलेले आहेत. प्रत्येक धर्माच्या,प्रत्येक जातीच्या अनुषंगाने प्रत्येकाला आप-आपल्यासंस्कृतीनुसार परंपरा, रिती - रिवाजाप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार मिळालेला आहे. भारतातील कुटुंब व्यवस्था ही पुरुषाच्या अधिकारात पत्त्याखाली चालते. कुटुंबातील करता हा पुरुष असतो. मुलां - मुलींच्या नावापुढे वडिलांचे नाव लावले जाते. त्यालाच आपण पितृसत्ताक कुटुंब पद्धती असे म्हणतो. परंतु आदिवासी समुदायांमध्ये फितूर सत्ता आणि मातृसत्ताक कुटुंब पद्धती दिसून येते. सर्वसाधारण पाहता भारतात पितृसत्ताक कुटुंब पद्धतीची संख्या अधिक आहे मात्र आदिवासी समुदायांमध्ये काही मोजक्या जमातीमध्ये मातुसत्ता कुटुंब पद्धती आहेत. अलीकडच्या काळात काही कुटुंबामध्ये वडिल भरले असेल तर काही मुलं आपल्या आईचे नाव आपल्या नावासमोर लिहितात. परंतु त्याचे प्रमाण आपल्याला कमी दिसते.भारतीय राज्यघटनेच्या 15 अन्वये धर्म, वंश, जात,जमात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई आहे.या धोरणामुळे पुरुष आणि स्त्रियांना समान अधिकार आणि हक्क प्राप्त झाले आहेत. महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे, शासन निर्णय, परिपत्रके असून सुद्धा त्यांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने अद्यापही महिला त्यांच्या हक्क आणि अधिकारापासून वंचित आहेत.

**शोध निबंधाचे उद्दिष्टे:**

1. महिलांचे अधिकार आणि हक्क जाणून घेणे.
2. महिलांचे सद्यस्थितीतील जीवन अभ्यासणे.
3. महिलांवर चला जाणारा अन्याय यांचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधणासाठी संशोधन पद्धती मधील दुय्यम स्रोतांचा उपयोग केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ/ पुस्तके , मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट वेबसाईट इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

**महिलांचे अधिकार आणि हक्कविषयी:**

समाजाच्या सर्व पातळीवर महिलांचे संरक्षण व विकास आणि एकंदरीत महिलांचा समाजातील दर्जा उंचावणे. राज्य आणि केंद्र शासन महिलांसाठी विशेष लक्ष देत असून या दृष्टिकोनातून केंद्र शासनाने मानव संसाधन विकास मंत्रालयामध्ये महिला व बालकल्याण हा स्वतंत्र विभाग निर्माण केला.त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महिला व बालकल्याण विभाग स्थापन करण्यात आला आहे.केंद्र शासनाने राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केलेली आहे .या राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर राज्य शासनानेही महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना केली आहे.भारतातील प्रत्येक क्षेत्रात महिलांना दिला जाणारा असमान दर्जा आणि अन्यायाची वागणूक थांबलेली दिसत नाही. संविधानातील आणि महिलांचे कल्याण व संरक्षण यासंबंधीच्या इतर कायद्यातील तरतुदीचा केला जाणारा भंग कायदाने गुन्हा आहेत. महिलांचा हक्क अनेक असताना सुद्धा त्या प्रमाणात त्यांना मिळत नाही आणि मिळू देत सुध्दा नाही. अशी एकंदरीत परिस्थिती राज्यात दिसते. महिलांच्या हक्क विषयी जागृती व प्रसार आणि समान अधिकाराविषयी मत परिवर्तन करण्याची गरज आहे. स्वतंत्र मिळण्यापासून आज पर्यंत महिलांच्या उन्नतीसाठी बऱ्याच उपाययोजना केलेल्या आहेत. भारताच्या संविधानामध्ये तशी तरतूद करण्यात आली आहे. परंतु यांचा फारसा फायदा महिलांना झाल्याचे दिसून येत नाही. स्वतंत्र प्राप्तीनंतर समाजातील इतर कमकुवत घटकाप्रमाणे महिलांच्या उन्नतीसाठी काही विशेष केले जाईल अशी अपेक्षा होते. केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने त्या दृष्टीने बऱ्याच उपाय योजना केलेल्या आहेत.तरीसुद्धा महिलांवर होणारे अत्याचार, हुंडाबळी, अंधश्रद्धा, समाजातील नियमाने, रूढी, परंपरा, महिलांची आर्थिक पिळवणूक, आर्थिक दर्जा, महिलानाचा अधिकार, महिलांतील साक्षरतेचे प्रमाण व अपुऱ्या आरोग्य सुविधा, महिलांचा छळ, पुरूषांची मानसिकता बदलण्याची गरज होती, तसेच कुटूंबातील मानसिक, शारीरिक अहवेलना इत्यादी.अद्याप सुरूच आहे. या कारणामुळे महिलांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभ्या राहण्यास अडथळा निर्माण होतो आहे. त्यामुळे महिलांना हक्क आणि अधिकारापासून समाजातील लोक आणि समाजातील विचार प्रवाह कारणीभूत आहेत असे वाटते. महिलांना त्यांचा हक्क व अधिकार मिळाला की, ते स्वत: हांच्या पायावर उभ्या राहतील. त्यासाठी शिक्षण, रोजगार, नौकरी, व्यवसाय, इत्यादी क्षेत्रात मोकळी किंवा सुट देणे आवश्यक आहे. कुटूंबातील जुन्या विचाराना दुर करणे काळाची गरज आहे. तसेच त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे आवश्यक आहे. त्यामुळे महिलांना पुरुषाच्या बरोबरीने संधी देऊन त्यांच्या हक्काची जपणूक करणे व त्यांची उन्नती व कल्याण साधने गरजेचे आहे. महिला आणि मुलींना समान मूलभूत अधिकार आहेत जसे की शिक्षण हिंसामुक्त जीवन, न्याय वेतन किंवा मतदान.भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस 8 मार्च 1943 रोजी साजरा करण्यात आला. ८ मार्च 1971 ला पुण्यात एक मोठा मोर्चा

काढण्यात आला होता. पुढे 1975 हे वर्षे युनोने 'जागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर केले त्यानंतर महिलांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या महिलांच्या संघटनांना बळकटी आली बदलत्या सामाजिक आर्थिक राजकीय संस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नाचे स्वरूप बदलत गेले तशा महिला संघटनेच्या मागण्याही बदलत गेल्या. भारतात 8 मार्च जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जात आहे. महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा केला जात आहे.

**कुटूंबातील महिलांचे स्थान:**

समाज व्यवस्थेमध्ये कुटुंबातील स्थान हे पुरुषाच्या अधिपत्याखाली चालते परंतु सद्यस्थितीमध्ये आता परिवर्तन होताना आपल्याला दिसत आहे. पुरुषाच्या जागी आता महिला सुद्धा कुटुंब प्रमुख म्हणून काम पाहतात. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत महिला सुद्धा आता सहभागी होऊ लागले आहेत. प्रत्येक क्षेत्रात व्यवहार, नोकरी, रोजगार ,शिक्षण, राजकीय क्षेत्रात महिला पावूल रुजू लागल्या आहेत. पुरुष विचारसरणीला आता विरोध दशवू लागल्या आहेत. महिला या कुटुंबप्रमुखाची म्हणजेच पतीची जागा घेत असून महिला सुद्धा कुठेही कमी नाही. प्रत्येक निर्णय प्रक्रियेत सहभागी होत असून कुटूंबाच्या आथिर्क बाजू बळकट करण्यासाठी पुढे येत आहे.

**महिला वारस हक्क :**

कुटुंब व्यवस्थेमध्ये पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे महिलांना सुद्धा कुटुंबातील मालमत्ता संबंधी हक्क मिळणे आवश्यक आहे. या अनुषंगाने केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने कायद्यात वेळोवेळी बदल करून महिलांना वारसा हक्क देण्याची तरतूद केली गेली आहे. त्यामुळे पतीचे संपत्ती व पैसा, मालमत्तायावर पत्नीची हक्क मिळते. महाराष्ट्राच्या जमीन महसूल अधिनियम,1966 च्या कलम 149 अन्वये अनुक्रमे बदलताना महिलांची नावे हक्कात नोंदणी आवश्यक आहे.

**बाल विवाह:**

बालविवाह कायदा 1929 चा कलम तीन, चार आणि पाच अन्वये कोणत्याही मुलीचे वय 18 वर्षे पूर्ण करताच विवाह करणे दंडणीय गुन्हा आहे.

**लिंग असमानता:**

भारतीय समाज रचनेमध्ये महिला आणि पुरुष यांच्या भुमिका असमान आहेत. कारण भारतात पुरूषप्रधान संस्कृती व परंपरा अस्तिवात असून महिलांना मात्र दुय्यम स्थान दिले गेले त्यातून लिंग या विषयी जन्मापासून असमानता दिसुन येते. लहान पणापासूनच शिक्षणातून आणि कुटूंब संस्थेतून मुलगा - मुलगी या विचाराने प्रभावित केले गेले. त्यामुळे भ्रूणहत्ये पासून सुरू झाली. त्यामुळे कुटूंबात मुलगी नको हा विचार पूढे आला. त्यामाध्यमातून भ्रूणहत्या निरंतर करू लागले. त्यामुळे मुलीच्या संख्येत झपाट्याने घट झाली. अशा प्रकारे महिलांच्या जीवनाचा मुलभूत अधिकार नाकारला जात आहे.

**महिला अधिकार:**

मानवा अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी भारतीय राज्यघटनेत अनेकतरतुदी करण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त राष्ट्रीय मानवाधिकार आयोग मानवी हक्काचे संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करीत आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीचे भेदभाव पूर्ण वर्तन हे सामाजिक अन्यायाचे एक प्रकार आहे. जगण्यासाठी सामाजिक न्यायाची नितांत गरज आहे. जाती, धर्म ,लिंगावर आधारित असमानता भारतीय समाजात दिसून येते. ही असमानता ही व्यक्तींच्या मानवा अधिकारांचे उल्लंघन करणारी बाब आहे. प्रत्येक व्यक्तीला आदर, प्रेम, आनंदी आणि निर्भरपणे जगण्याचा हकक आहे.

**बेटी बचाओ- बेटी पढाओ :**

भारतात केंद्र शासनाच्या अभियाना अंतर्गत 21 फेब्रुवारी 2015 रोजी मुलीचा जन्मदर कमी असणाऱ्या शंभर जिल्ह्यामध्ये "बेटी बचाओ- बेटी पढाओ" ही मोहीम सुरू केली गेली यात महाराष्ट्रातील 16 जिल्हे समाविष्ट आहेत. कारण मुलांच्या संखयाप्रमाणे मुलींची संख्या मध्ये वाढ व्हावी. भ्रूमहत्या थांबली गेली पाहिजे. मुलींचे शिक्षण झाले पाहिजे. या अनुषंगाने केंद्र सरकारने मुली वाचवा आणि शिक्षित बनवा अशा प्रकारे योजना सुरू केले आहेत.

**हुंडा पद्धत:**

हुंडा निषेध कायदा केला आहे. 26 नोव्हेंबर हा दिवस हुंडा निषेध दिन म्हणून पाळला जातो. कुटुंबातील मुला - मुलींचे विवाह नातेसंबंध जोडताना हुंडा घेणे आणि देणे हा कायद्यानुसार गुन्हा ठरतो. हुंडा म्हणजे वर किंवा वधू पक्षाकडून विवाहाच्या वेळी केली जाणारी कोणतीही मागणी म्हणजे हुंडा. पैसे, कपडे, रोकड, सोने व मूल्यवान वस्तू इत्यादी. स्वरूपाची मागणी म्हणजे हुंडा याला कायद्याने कायदेनुसार गुन्हा मानले जाते. परंतु कुटुंब संस्थेकडून मुला- मुलींचे विवाह जोडताना हुंडा दिला आणि घेतला ही जातो. परंतु जोपर्यंत पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल होत नाही तोपर्यंत तो गुन्हा सिद्ध होत नाही. त्यामुळे आजही कुंटूबव्यवस्थे कडून सरापणे हुंडा हा घेतला हि जातो आणि तिलाही जातो असे दिसते. हुंडा विषयी प्रतिबंधक कायदा केला असला तरी मात्र त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसत नाही.

**मेरी बेटी भाग्यश्री योजना:**

01जानेवारी 2014 पासून जन्मलेल्या मुलीसाठी सुकन्या योजना अमलात आणली आहे. महाराष्ट्र राज्यातील मुलींचे शिक्षण आणि आरोग्य सुधारण्यासाठी त्यांच्या उज्वल भविष्यासाठी, आर्थिक तरतूद करणे, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी, मुलींच्या जन्माबद्दल समाजात सकारात्मक विचार आणणे, बालविवाह रोखणे आणि जन्मदर वाढवणे इत्यादीसाठी महाराष्ट्र शासन मुलींसाठी त्यांच्या

विकास आणि अधिकाराबदल जागृती घडवून आणत आहेत.

**समान काम आणि समान वेतन:**

देशात विविध कार्यालय आणि विभागात नोकरी करत आहे. त्यामुळे पुरुषांना ज्या पदावर समान काम असते त्या पद्धतीने महिला सुद्धा काम करीत असून समान वेतन त्याना पण मिळताना दिसत आहे.

भारतीय समाजात महिलांना पूर्वीपासून दुय्यम स्थान असल्यामुळे त्यांच्या सामाजिक समाज उन्नतीसाठी महिलांचा सहभाग त्यांचा मान - सन्मान त्यांचे औदर्य यांचा हक्क या सर्व गोष्टीची जोपासना होणे गरजेचे आहे. हे मर्म जाणल्यामुळेच जीवनात समान मान - सन्मान हक्क इत्यादी गोष्टींना तिलांजलिच मिळालेली होती. विविध विचारवंतांनी तसेच समाजसुधारकांनी महिलांच्या शिक्षण मूलभूत हक्क समाजातील सहभाग यावर वारंवार पुष्टी केली आहे.

**संदर्भ:**

1. Women's Rights are Human Rights. (2014). United Nations. Retrieved October 02, 2017 from http://www.ohchr.org/Documents/Events/WHRD/WomenRightsAreHR.pdf
2. Anonuevo, C.M. (Ed.). (1995). Women, Education and Empowerment:
3. Pathways towards
4. Autonomy. Retrieved October 02, 2017 from
5. http://www.unesco.org/education/pdf/283_102.pdf
6. http://mls.org.in
7. https://mr.vikaspedia.in
8. त्रिपाठी,प्रदिप)2006) भारतीय संविधान और मानवाधिकार . .राधापब्लिकेशन:दिल्ली
9. मेहरोत्राममता).2015) महिला अधिकार . हिंदी बुक सेंटर :नई दिल्ली
10. आहुजाराम)2000) भारतीय समाज, नई दिल्लीरावत पब्लिकेशन: